(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांकः-पोमसं/३-अ/पदो/पोउपनि मो.प. ते पोनि मो.प./६३/२०१७ मुंबई,दिनांक :-११/०९/२०२५

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दि.१४/०७/२०२१

४. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ, मुंबई यांनी मुळ अर्ज क्र. ९१५, ९५८, ९५९, ७९९ व १०६७/२०१७ मध्ये दि.२०/०१/२०२५ रोजी दिलेले आदेश.

## -: आदेश :-

उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन यांना पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रा-पात्रता तपासण्यात आली असता, खालील नमूद पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन यांना पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने पात्र ठरविले आहे. खालील नमूद अधिकारी यांना पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून **"पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन"** या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे :-

| अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | संजय कृष्णाजी बोरेकर | अमरावती शहर | अमरावती | अमरावती शहर |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**६. पदोन्नत झालेले अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखाकार २, महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन यांना पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन (PSI MT to PI MT) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २/९/११/११-अ/३६/४०.

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.